श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

<u>हिरवा चारा पुरवठा कामाची जाहीर निविदा.</u>

गोशाळेसाठी हिरवा चारा पुरवठा करणेकामी जाहीर निविदा मागविण्यात येत आहेत. त्या संबंधीची माहिती, अटी, शर्ती व निविदा फॉर्म तुकाराम भवन, पंढरपूर येथे आणि www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. इकडील नमूना फॉर्ममध्येच निविदा भरून देणेची आहे. तसेच अनामत रक्कम रू.२५,०००/—डी.डी./रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे. सिलबंद निविदा कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे नावे दिनांक ११/०४/२०१६ रोजी सायं. ५:०० वाजेपर्यंत पोहोचेल अशी पाठवावी. प्राप्त निविदा दिनांक ११/०४/२०१६ रोजी तुकाराम भवन येथे सायं ५:०० वा. उघडल्या जातील.

क्र.गोशाळा/कावि/०३२/२०१६ दि. २९/०३/२०१६

सही XXX

कार्यकारी अधिकारी

(संपर्क क्र. ०२१८६—२२३५५०,

९४२२०१५६९१, ९३७३६३३६२६)

# श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

**<u>निवीदा फॉर्म</u>**

<u>हिरवा चारा पुरवठा करणे कामाची जाहीर निविदा</u>

प्रति,
मा.कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर.

विषयः— हिरवा चारा पुरवठा करणेकामी दरपत्रक.

पुरवठादाराचे पूर्ण नाव :— श्री.------------------------------

पूर्ण पत्ता :— ------------------------------

------------------------------

मोबाईल क्रं.:— ------------------------------

महोदय,

श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरचे हिरवी वैरण पुरवठा करणे कामाची दिनांक ३०/०३/२०१६ रोजीचे दैनिक सकाळ, सोलापूर वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदे प्रमाणे आमच्याकडे उपलब्ध असलेल्या हिरव्या वैरणीचे दरपत्रक खालीलप्रमाणे सादर करीत आहेत.

| अ क्र | तपशील | गुणवत्ता | दर प्रती १०० किलो. (जागेवर पोहोच करण्यासह) |
|---|---|---|---|
| ०१ | हिरवा चारा (कडवळ किंवा मका) | उत्तम | |

सदर दराने हिरवा चारा दि.२४/०४/२०१६ ते ३१/०३/२०१७ पुरवठा करणेस मी बांधील राहील. तसेच याबाबतच्या आपणाकडून देण्यात आलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून त्यासंबंधीचे जरूर ते प्रतिज्ञापत्र स्टॅम्पपेपरवर करून देण्यास तयार आहे. रू.२५,०००/— अनामत रकमेचा डी.डी./पावतीची झेरॉक्स प्रत सोबत जोडली आहे. तरी वर नमुद दरपत्रकाप्रमाणे हिरवा चारा पुरवठा करणेचे काम मला मिळण्यास विनंती आहे.

दिनांक / /२०१६ पुरवठाधारकाची सही

सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत.

१. अनामत रक्कमेचा डी.डी/ रोखीच्या पावतीची झेरॉक्स प्रत.
२. पूर्वी हिरवा चारा पुरवठा कामाची अनुभवाची प्रमाणपत्रे.
३. स्वत:च्या ओळखपत्राची झेरॉक्स प्रत. (उदा. पॅनकार्ड, मतदान कार्ड व आधारकार्ड)

**श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

हिरवा चारा पुरवठा करणे कामाची जाहीर निविदा

**माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे.....**

१. नमूना निविदा फॉर्म कार्यालयीन वेळेत तुकाराम भवन येथे उपलब्ध होवून मिळतील. तसेच www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळतील. निविदा फॉर्म स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि निविदा हिरवा चारा पुरवठा कामासाठी भरलेली आहे, असा सविस्तर तपशिल नमुद करावा. निविदा समक्ष तुकाराम भवन येथे सादर कराव्यात किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

२. अनामत रक्कम रू.२५,०००/—डी.डी./रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे. डी.डी. 'कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर' यांचे नावे काढावा.

३. पुरवठादाराने निविदा फॉर्ममध्ये नमुद केलेल्या दराने हिरवा चारा दि.२४/०४/२०१६ ते ३१/०३/२०१७ या कालावधीत इकडील मागणी प्रमाणे पुरवठा करणे आवश्यक आहे.

४. हिरवी वैरण पुरवठा कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ क्र | मालाचा प्रकार | आवश्यक गुणवत्ता | अंदाजे दररोज पुरवठा करावयाचा हिरवा चारा |
|---|---|---|---|
| ०१ | हिरवा चारा (कडवळ किंवा मका) | उत्तम | ३००० किलो |

५. मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या नमुन्यांतच मालाचा पुरवठा करणेचा आहे.

६. पुरवठा करण्यात आलेल्या हिरव्या चाऱ्याच्या वजनाची पावती माल पुरवठा करताना जमा करणे आवश्यक आहे.

७. सदर मालाचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार दिलेल्या मुदतीत रोजचे रोज स.१०.०० ते दु. १२.०० या वेळेत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरून मालाच्या किमतीच्या ५ टक्के पर्यंत दंड आकारण्यात येईल.

८. पुरवठादाराच्या चुकीने मालाचे नुकसान झाल्यास नुकसान भरपाई पुरवठादाराचे बिलातून वसूल करण्यात येईल.

९. माल खराब असल्याचे आढळून आलेस पुरवठा धारकास जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही.

१०.पुरवठा करण्यात आलेल्या मालाची प्रत व प्रमाण संबंधित विभागाकडून मोजणी व तपासणी करून अहवाल सादर केल्या खेरीज बील अदा केले जाणार नाही.

११.हिरवा चारा गोशाळा विभाग, गणेश नर्सरी जवळ, गणेश नगर, पंढरपूर येथे पुरवठा करणे आवश्यक आहे.

१२.माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस निविदाधारक जबाबदार राहील.

१३.समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहील.

१४.प्रशासकीय व अन्य कारणास्तव निविदा कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

१५.सदर कामासंबंधी काही वाद उद्भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

१६.वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठादारास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर निविदा कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

१७.निविदा ज्यांचे नांवे मंजूर झालेली आहे त्यांनी रक्कम रूपये १००/— चे स्टॅम्प पेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे (affidivit) प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.

———————‘‘————————